# निर्दोषांना सजा नको: वसंत-रजब यांचे स्मारक

**- डॉ. राम पुनियानी**

२००२च्या गुजरातमधील हिंसेचे वर्णन शब्दात करणे ही कठीण गोष्ट आहे. गोध्रा येथे ट्रेनला लागलेल्या आगीत ५८ निर्दोष व्यक्ती जिवंत जाळून देण्याच्या प्रसंगाच्या बहाण्याने, मोठ्या प्रमाणात हिंसा फैलावण्यात आली आणि त्यात १०००हून अधिक लोक मारले गेले. या दंग्यांनंतर अनेकदा मला गुजरातला जावे लागले, आणि त्याच दौऱ्यांमध्ये मला, १९४६च्या जुलैच्या अहमदाबाद येथे झालेल्या दंगलीत लोकांना वाचविण्यासाठी आपले प्राण त्यागणाऱ्या या दोन महान नवयुवकांबद्दल माहित झाली. वसंतराव हेगिष्टे आणि रजब अली लखानी हे ते दोन नवयुवक होते. दोघेही जवळचे मित्र आणि काँग्रेस सेवादलाचे कार्यकर्ते होते. निर्दोषांचे रक्त सांडत असल्याचे पाहून ते रस्त्यावर उतरले. वसंतरावने मुसलमानांना वाचविण्याचा प्रयत्न केला तर रजब अलीने हिंदूंना. उन्मानी दंगलखोरांनी दोघांनाही ठार मारले.

या दोघांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुजरातच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी सांप्रदायिक सद् भावना दिवस पाळणे सुरु केले. गुजरात सरकारने याला मान्यता देऊन, दोघांचे संयुक्त स्मारक करण्याचा निर्णय घेतला. स्मारकाच्या अनावरणाच्या कार्यक्रमाच्या वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांवरून या कार्यक्रमाला वसंतराव यांचे कुटुंबीय उपस्थित होते, परंतु रजब अलीच्या नातेवाईकांनी कार्यक्रमात भाग घेतला नाही असे समजते.

सन १९४६ नंतर, देशभरात सांप्रदायिक दंग्यांच्या घटनांमध्ये वेगाने वाढ झाली. दंग्यांनी आणखी मोठे आणि भयावह स्वरुप धारण केले. रजब अलीच्या परिवाराला नंतर झालेल्या हिंसांमध्ये निवडून-निवडून मारण्यात आले. यामुळे रजब अलीचा परिवार त्याच्याशी आपले नाते लपवू लागला. जेव्हा त्यानेही काम चालले नाही, तेव्हा त्यांच्यातील काहींनी हिंदू नावे घेतली, तर काहींनी हिंदू धर्म स्वीकारून ते कॅनडा व अमेरिकेला स्थलांतरित झाले. उच्च मूल्यांशी असलेल्या त्याच्या प्रतिबद्धतेमुळे त्याच्या परिवारातील लोक विघटनकारी लोकांचे लक्ष्य बनतील, असा विचार कधी धार्मिक सद् भावनांवर श्रद्धा ठेवणाऱ्या रजब अलीच्या मनात आला नसेल. हा दु:खद घटनाक्रम हिंदू-मुसलमान हिंसा होत असताना, मुसलमान स्वतःला किती असुरक्षित समजतात, ती गोष्टही सांगतो. ते आपल्याच मोहल्ल्यात आकुंचित असल्यासारखे झाले आहेत. सांप्रदायिक दंग्यांमध्ये शिकार होण्याचे मुसलमानांचे प्रमाण, लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणापेक्षा

अनेक पट जास्त आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने १९९१मध्ये जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, दंग्यांत ठार मारल्या जाणाऱ्यांमध्ये मुसलमानांचे प्रमाण ८० टक्के आहे, तर लोकसंख्येत त्यांचे प्रमाण केवळ १२ टक्के आहे.

गुजरात हिंसेनंतर, हिंदू आणि मुसलमानांतील कार्यकर्त्यांनी आणि दोन्ही समाजातील प्रमुख व्यक्तींनी, मोठ्या संख्येने शांतीच्या पुनर्स्थापनेसाठी कार्य केले. नवे सरकार आल्यानंतर एका वर्षात सांप्रदायिक हिंसांच्या घटनांमध्ये २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आंतर-सामुदायिक नात्यांमध्ये तणाव आणि कटुता आली आहे. आणि रजब अलीच्या नातेवाईकांना ज्यातून जावे लागले, ते या दु:खद परिस्थितीला रेखांकित करते.

सांप्रदायिक हिंसा, धर्माच्या नावावर हिंसा या गोष्टी कर्करोगासारख्या आमच्या समाजात पसरल्या आहेत. याची सुरुवात इंग्रज राज्यकर्त्यांच्या 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाने झाली. त्यांनी इतिहासाचे सांप्रदायिक संस्करण तयार केले. राज्यकर्त्यांच्या धर्माला त्यांनी त्यांच्या धोरणाचा निर्धारक म्हणून समोर ठेवले. सर्व राज्यकर्त्यांचा, सत्ता आणि संपत्ती मिळविणे, हा एकच धर्म असतो, या गोष्टीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले. त्यांचा धर्म गौण असतो. इतिहासाच्या याच सांप्रदायिक संस्करणाचा उपयोग, संधीसाधू संघटनांनी दुसऱ्या धर्माबाबत घृणा पसरविण्यासाठी करणे सुरु केले. या संघटना स्वातंत्र्य आंदोलनापासून दूर राहिल्या. हिंसक सांप्रदायिक झटापटी सुरु झाल्या आणि सामान्यांच्या मनात, अन्य धर्माचे लोक त्यांचे शत्रू आहेत असे भरविले गेले. सांप्रदायिक राजकारण्यांनी अशा प्रकारच्या मिथकांना उत्तेजन दिले. आजवर, दंग्यांची चौकशी करण्यासाठी वेळोवेळी नेमण्यात आलेल्या चौकशी आयोगांच्या अहवालांतून ही गोष्ट स्पष्ट होते की, दंगलीनंतरच्या निवडणुकीत जातीय संघटनांचा फायदा होतो. तेच आपण भारतात होताना पाहत आहोत. हिंसेच्या शिडीवरून जातीयवादी संघटना सत्तेवर येवू पाहत आहेत.

वाढत्या हिंसेविरोधात अनेक नेत्यांनी शांती आणि सद् भावाच्या बाजूने आपला आवाज उठविला आहे. गांधीजी आणि त्यांच्या जवळच्या नेत्यांनी सद् भाव आणि हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी मोठे प्रयास केले आहेत. हिंदू-मुस्लिम ऐक्य गांधीजींच्या राजकारणाचे केंद्रीय तत्व होते. असे असतानाही सांप्रदायिक हिंसा वाढत राहिली आणि गणेश शंकर विद्यार्थी सारख्या अनेकांना निरपराधांचे प्राण वाचविताना आपले प्राण गमवावे लागले. या हिंसेचे स्वरूप बदलल्याचे आज आपण पाहत आहोत. खुनी दंगलींची जागा आता अल्पसंख्याकांना घाबरविण्याच्या आणि धमकावण्याच्या प्रकारांनी घेतली आहे. मंदिर, मशीद, चर्च, गोमांस भक्षण इ. मुद्दे घेवून अल्पसंख्याकांना घाबरवले आणि धमकावले जात आहे. सांप्रदायिक संघटनांचे मुख्य लक्ष्य

विभिन्न समुदायांचे धार्मिक आधारे ध्रुवीकरण करणे हे आहे.

आज जर गांधी असते, तर त्यांनी काय केले असते? शांतीच्या स्थापनेसाठी अनेक प्रयास केले जात आहेत. यात मोहल्ला कमिट्या, शांती सेना, अंतर्धार्मिक संवाद, धार्मिक सण विविध धर्माच्या लोकांनी एकत्रितपणे साजरे करणे, कबीर उत्सव, सौहार्द वाढविणारे चित्रपट, आणि धार्मिक ऐक्याच्या आवश्यकतेवर लोकांना जागृत करण्याचे अभियान चालविणे यांचा समावेश होतो. सांप्रदायिक हिंसेची शिकार झालेल्या लोकांना न्याय मिळावा, यासाठीही सामाजिक कार्यकर्ते प्रयत्न करतात.

विभिन्न समुदायांना आपल्या-आपल्या वस्त्यांपुरते संकुचित होण्यापासून कसे थांबविता येईल? दुसऱ्या समुदायाबाबतच्या नकारात्मक विचारांशी कसे लढता येईल? ही आजची मोठी आव्हाने आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न करणे यासाठी आवश्यक आहे की, कुण्या दुसऱ्याला आपल्या धर्म, रजब अलीच्या कुटुंबाप्रमाणे लपवावा वा बदलावा लागू नये.